# प्रेसनोट

## कार्यालय, राज्य विमा कामगार सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर येथील कनिष्ठ लिपीक यांचे विरुध्द नागपूर लाचलचुपत प्रतिबंधक विभागाने केली यशस्वी सापळा कारवाई.

यातील तक्रारदार ह्या ASHPA Global PVT LMT येथे कामावर असून तक्रारदार यांच्या प्रसूतीच्या एकूण ३९,२५०/- रुपये वैद्यकीय बिलाची प्रतिपूर्ती करून देण्याकरिता आरोपी लोकसेवक श्री. हर्षल अरुण कसबे, वय ३७ वर्षे, पद कनि ष्ठ लिपिक, प्रभारी वैद्यकीय अधिकारी यांचे कार्यालय, राज्य विमा कामगार सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांनी आठ टक्के प्रमाणे ३०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ACB कार्यालय नागपूर येथे तक्रार नोंदवली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८/०५/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. हर्षल अरुण कसबे, पद कनिष्ठ लिपिक, कार्यालय, राज्य विमा कामगार सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांनी तक्रारदार यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती करून देण्याकरिता ८ टक्के प्रमाणे ३०००/- रूपये लाचेची मागणी करून स्वत: स्वीकारण्याची तयारी दर्शवली. तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक श्री. हर्षल अरुण कसबे, पद कनिष्ठ लिपिक यास विनंती करून सध्या त्यांचेकडे पूर्ण रक्कम नसल्याने सुरवातीला २,०००/- रुपये व नंतर बाकी रक्कम देणार असे सांगितल्याने आरोपी लोकसेवक यांनी त्यास स्विकृती दिली.

दिनांक २५/५ /२०२६ रोजी लाच सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. हर्षल अरुण कसबे, पद कनिष्ठ लिपिक, कार्यालय, राज्य विमा कामगार सेवा दवाखाना, पाचपावली नागपूर यांनी तक्रारदार यांचेकडुन वैद्यकीय बिलाची प्रतिपूर्ती करून देण्याकरिता २०००/- रुपये लाच मागणी करून २,००० /- रुपये लाच स्वत:चे कक्षात स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत पोलीस स्टेशन पाचपावली, नागपूर शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई ही डॉ. दिंगबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक व श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. अनिल जिट्टावार, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि., नागपूर यांचे पर्यवेक्षणाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वैरागडे, सापळा पथकातील पोहवा आशिष वैद्य, मपोहवा अस्मिता मेश्राम, गिता चौधरी, करूणा सहारे, पोअं. होमेश्वर वाईलकर, प्रफुल भातुलकर, चालक पोअं राजेन्द्र जांभुळकर सर्व नेमणुक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांनी केलेली आहे.

नागपूर जिल्हयातील सर्व नागरिकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आंत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा**

१. पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
२. टोल फ्री क्रमांक : १०६४ / व्हॉटसअॅप क्र. ९०६७६७१०६४
३. डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
४. श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
५. श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
६. श्री. राजीव कर्मलवार, पोलीस निरीक्षक, वाचक लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०